सिंचन व इतर प्रकल्पांसाठी भोगवटादार वर्ग-२/नियंत्रित सत्ता प्रकार या धारणाधिकाराच्या जमिनी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने खरेदी करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन शुद्धीपत्रक क्र. संकिर्ण-०४/२०१६/प्र.क्र.४९/अ-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :-१८ डिसेंबर, २०१७.

वाचा :- १) शासन निर्णय, समक्रमांक दि.२६.०५.२०१६

प्रस्तावना:-

सिंचन व इतर प्रकल्पांसाठी भोगवटादार वर्ग-२/नियंत्रित सत्ता प्रकार या धारणाधिकाराच्या जमिनी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने खरेदी करणेबाबत संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली आहे.

तसेच उक्त जमिनीच्या अनुषंगाने शासनास येणे असणा-या रकमा संबंधित कायद्यानुसार किंवा प्रचलित शासन निर्णयानुसार वसूल करण्याबाबत निदेश देण्यात आलेले होते. तथापि, थेट खरेदीने खाजगी जमिनी ताब्यात घेतांना अनर्जित रक्कम वसूल करण्याबाबत भिन्नता असल्याने एकवाक्यता राहण्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णय दि.२६.०५.२०१६ मध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार सर्वंकष विचार करुन खालीलप्रमाणे सुधारणा शासन करीत आहे.

शुद्धीपत्रक :-

शासन निर्णय, दि.२६.०५.२०१६ मधील " शासन निर्णय " या मथळ्याखालील पृ.क्र.२ येथील शेवटच्या परिच्छेदातील ७ व्या ओळीतील -- तदनंतर, भोगवटादार वर्ग-२/नियंत्रित सत्ता प्रकार या धारणाधिकाराच्या जमिनींच्या संदर्भात संबंधित कायद्यानुसार किंवा प्रचलित शासन निर्णयानुसार शासनास येणे असणाऱ्या रक्कमा, संबंधित भूधारकांना अशा जमिनीच्या मोबदल्यापोटी देय होणाऱ्या मोबदल्यातून वजा करुन घेऊन उर्वरित रकमेचे प्रदान संबंधितांना करण्यात यावे."

या मजकूराऐवजी

"भोगवटादार वर्ग-२/ नवीन व अविभाज्य शर्तीच्या जमिनी खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पद्धतीने सार्वजनिक प्रकल्पांसाठी घेतांना अशा जमिनीच्या एकूण देय मोबदला रकमेच्या १०% इतकी रक्कम अनर्जित रक्कम म्हणून आकारण्यात यावी.

तसेच, ज्या ठिकाणी जमिनींना काही कायदेशीर तरतुदी उदा.कुळ कायदा, इनाम कायदा, इत्यादी लागू असतील त्या ठिकाणी थेट खरेदी करताना संबंधित अधिनियमातील तरतुदींनुसार

अनर्जित रक्कम/नजराणा वसूल करणे बंधनकारक राहील. तसेच महार वतन जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने खरेदी करतांना शासन निर्णय क्र.जमीन-२०१५/प्र.क्र.८७/ज-१अ, दि.११ जानेवारी,२०१७ प्रमाणे अनर्जित रक्कम / नजराणा वसूल करणे बंधनकारक राहील." असे वाचावे.

उर्वरित मजकुरामध्ये कोणताही बदल नाही.

०२. सदरहू शुद्धीपत्रक महसूल व वन विभाग (ज-१) व वित्त विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संकेतांक क्र २०१७१२१८१७४१४२७९१९ असा आहे. सदर शुद्धीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subhash K Gawade

Digitally signed by Subhash K Gawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=40b8b2876e2135f5b158b877f59754b2a7ddf64e0cf59f2dc33ad60b8bce5bcd, cn=Subhash K Gawade
Date: 2017.12.18 17:47:49 +05'30'

(सु.कि.गावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,राजभवन,मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मुख्यमंत्री सचिवालय,मुंबई
३) मा.मंत्री (महसूल)यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
४) मा.मंत्री (वित्त व वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
५) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
६) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
७) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय,मुंबई
८) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई
९) अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक,वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
११) प्रधान सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई
१२) प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई
१३) प्रधान सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई
१४) सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई
१५) सर्व विभागीय आयुक्त
१६) सर्व जिल्हाधिकारी
१७) संचालक, नगररचना, पुणे
१८) सर्व अधिक्षक अभियंता (सार्वजनिक बांधकाम/जलसंपदा)
१९) सर्व जिल्हा सरकारी वकील
२०) निवडनस्ती (अ-२).